بسم الله الرحمن الرحيم    نحمده ونصلي على رسوله الكريم    وعلى عبده المسيح الموعود

لا اله الا الله محمد رسول الله

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Ph:+91-1872-220186, Fax: +91-1872-224186, Mob. +91-98154-94687, E-mail:ansarullahbharat@gmail.com

# आपली ईद केवळ दिखाव्याची ईद नसावी,

# तर ती अल्लाहचे हक्क आणि माणसांचे हक्क पूर्ण करण्याची ईद असावी।

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔
إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔
صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

(दिनांक: ०६ जून २०२५ (०६ अहसान १४०४ हिजरी शम्सी), **मस्जिद मुबारक, इस्लामाबाद (यूके)** येथे हजरत मिर्झा मसूर अहमद(खलीफतुल मसीह पाचवे) यांनी दिलेल्या ईद-उल-अजहा **खुतब्याचा संक्षिप्त मराठी सारांश** दिला)

**तशहुद, तअव्वुज, सूरह अल-फातिहा आणि सूरह अल-हजमधील आयत ३५ ते ३९ यांचे पठण आणि भाषांतर केल्यानंतर हुजूर अनवर (अल्लाह तआला त्यांना आपल्या सहाय्याने समर्थ करो) यांनी फरमावले:**

**आपल्याला हे समजावून सांगितले आहे की, कुर्बानीचा अर्थ फक्त इतकाच नाही की इतरांची कुर्बानी घ्यावी, जशी ईद-उल-अजहाच्या दिवशी जनावरांची कुर्बानी दिली जाते; तर यामधून हे शिकवले जाते की उच्च आणि महान गोष्टीसाठी कनिष्ठ गोष्टीचा त्याग केला जातो. त्यामुळे तुम्हीही आपल्या निर्माणकर्त्या परमेश्वरासाठी त्याग करण्यास सदैव तयार राहिले पाहिजे।अल्लाह तुमच्याकडून फक्त तक्वावर चालण्याची अपेक्षा ठेवतो.अल्लाह तआला तुमच्याकडून एवढीच इच्छा करतो की त्याची भीती आणि आदर तुमच्या अंतःकरणात कायम राहावा आणि तुम्ही प्रत्येक वेळी या प्रयत्नात राहावे की, मी त्याच्या आदेशांचे पालन करून त्याची प्रसन्नता कशी मिळवू शकतो।**

हुजूर अनवर यांनी फरमावले:आजकाल पाकिस्तानमध्ये अहमदिया जमातला कुर्बानी करण्यापासून रोखले जाते आणि गेल्या अनेक वर्षांपासून हेच सुरू आहे की आम्हाला कुर्बानी करू दिली जात नाही. परंतु खरी गोष्ट म्हणजे तक्वा होय. म्हणजेच, जर कुर्बानी करण्याची परवानगी मिळाली नाही तरीही अल्लाह् तआला आपल्या हेतूंना जाणतो की आपण कोणत्या नीयतीने कुर्बानी करू इच्छितो।जर आपली नीयत तक्वावर चालत कुर्बानी करण्याची असेल, तर कुर्बानी करता आली नाही तरीही अल्लाह् तआला आपल्या कुर्बान्या स्वीकारणारा आहे.जे लोक केवळ दिखाव्यासाठी कुर्बानी करतात, ती तर तक्वाशून्य कुर्बानी आहे।हे लोक अल्लाह् तआलाच्या आदेशांचे पालनकरतआहेतका?अल्लाह् तआलाने असा आदेश दिला आहे का की लोकांचे हक्क पायदळी तुडवा?अल्लाह् तआला असे म्हणतो का की लोकांवर अत्याचार करा किंवा त्यांनाअल्लाहचीउपासनाकरण्यापासूनरोखा?अल्लाह तआलाने तर असे आदेश दिलेले नाहीत।अल्लाह् तआलाने तर प्रत्येक अशा व्यक्तीला, ज्याने “ला इलाहा इल्लल्लाह” म्हटले आहे, मुस्लिम घोषित केले आहे. परंतु आजकाल पाकिस्तानमध्ये अहमदिया समुदायाबरोबर जे काही केले जात आहे, त्या गोष्टी अल्लाह तआलापासून दूर नेणाऱ्या आहेत. हा अन्याय आहे.तथापि, आपले कर्तव्य हे आहे की आपण ही गोष्ट समजून घ्यावी की कुर्बान्या या अल्लाह् तआलाची निकटता मिळवण्यासाठी असतात. त्यामुळे जर आपण कुर्बानी करू शकलो नाही, तरीही अल्लाह् तआला ती स्वीकारतो, कारण त्याने स्वतः असे सांगितले आहे की माझ्यापर्यंत तुमच्या कुर्बानीचे मांस किंवा रक्त पोहोचत नाही, तर तुमचा तक्वा माझ्यापर्यंत पोहोचतो।फरमावले: अल्लाह् तआलाने स्पष्टपणे सांगितले आहे की आपल्या निर्मितीचा उद्देश म्हणजे अल्लाहचे हक्क पूर्ण करणे आणि त्याची बंदगी करणे आहे. यामध्ये सर्वात पहिली गोष्ट म्हणजे जमातबद्ध (बाजमात) नमाजाची स्थापना करणे.आजकाल जेव्हा सर्व बाजूंनी कठोरता केली जात आहे, तेव्हा आपले कर्तव्य आहे की आपण आपल्या नमाजांची अधिकाधिक काळजी घ्यावी. आपल्याला पाहिजे की अल्लाह् तआलाच्या दरबारात रडून दुआ मागाव्यात, जसे एखादा कत्तल होणारा प्राणी वेदनेने तडफडतो, तसेच आपल्या कृतींमधून आपली भावना व्यक्त झाली पाहिजे. पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या अहमदियांना विशेषतः याकडे लक्ष द्यायला हवे.नमाज आपण फक्त एक कर्तव्य म्हणून पार पाडण्यासाठी नाही, तर त्याचा खरा हक्क अदा करण्यासाठी वाचायला हव्या. त्या जमातबद्ध आणि सुंदर रीतीने, मनापासून अदा कराव्यात।

हुजूरफरमावतात:

आज आपण असा संकल्प करावा की आपण आपल्या उपासनेच्या दर्जाला उंचावणार आहोत. पाकिस्तानमध्ये कदाचित आपल्याला ईदची नमाज वाचण्याची परवानगी मिळणार नाही, प्रशासनाकडून बंधने घालण्यात येतील किंवा आधीच घातली गेली आहेत, पण आपण त्याची पर्वा करू नये आणि आपल्या हृदयात निराशेला स्थान देऊ नये. निश्चितच आपण आपल्या घरांमध्ये ईदची नमाज वाचू शकतो.परंतु आपण हा संकल्प करावा की आपण अल्लाह तआलाची उपासना आणि त्याच्या सेवकांचे हक्क पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. नमाजाचा खरा हक्क अदा करण्यासाठी आपण पूर्ण मनापासून प्रयत्न करायला हवेत।

हजरत मसीह मौऊद अलैहिस्सलाम यांनी असे म्हटले आहे:उपासनेचे दोन भाग असतात. पहिला भाग म्हणजे माणसाने अल्लाह तआलाचे भय बाळगावे, जे त्याच्यापासून योग्य प्रकारे भीती बाळगण्याचा हक्क आहे. दुसरा भाग म्हणजे माणसाने अल्लाह तआलावर प्रेम करावे, जे त्याच्यावर प्रेम करण्याचा योग्य हक्क आहे।

फरमावले:
इस्लामने या दोन्ही आज्ञा पूर्ण करण्यासाठी नमाजाची व्यवस्था ठेवली आहे, ज्यामध्ये अल्लाहच्या भीतीचा पैलू समाविष्ट आहे. दुसऱ्या बाजूला प्रेमाच्या अभिव्यक्तीसाठी हजची व्यवस्था ठेवली आहे.शत्रूंचा प्रयत्न हा असतो की अहमदी आपल्या ईमानापासून दूर व्हावेत, परंतु ते यामध्ये कधीही यशस्वी होऊ शकत नाहीत. जो मजबूत अहमदी आहे, ज्याच्या हृदयात ईमान आहे, तो कधीही त्यांच्या अत्याचारांमुळे मागे हटू शकत नाही.आपण प्रयत्न केला पाहिजे की या दिवसांत आपण आपल्या उपासनेच्या दर्जाला अधिक उंचावावे।

अनेक पाकिस्तानी अहमदी असे आहेत ज्यांचे नातेवाईक परदेशात राहतात. जर त्यांना पाकिस्तानमध्ये कुर्बानी करता आली नाही, तर ते परदेशातील आपल्या नातेवाईकांच्या माध्यमातून कुर्बानी करवू शकतात. आफ्रिकेतील गरीब देशांमध्येही कुर्बानी करवता येते. जर कुर्बानीपासून रोखले गेले तरीही अल्लाह तआलाने कुर्बानी करण्याचे इतर मार्ग दिलेले आहेत.अल्लाह तआलाने असा आदेश दिला आहे की गरीबांची काळजी घ्या, त्यांना अन्न द्या आणि त्यांच्या गरजांकडे लक्ष द्या।

अल्लाह तआलाने हज सोबत कुर्बानी ठेवली आहे, पण कुर्बानीसाठी इतरही संधी आहेत; त्यांचा लाभ घ्यायला हवा.तसेच वेळ आणि संपत्तीची कुर्बानीही असते, त्यासाठीही पूर्ण प्रयत्न करायला हवेत.आणि ज्या गोष्टींपासून अल्लाह तआलाने रोखले आहे, त्यांपासून दूर राहणे हीसुद्धा एक प्रकारची कुर्बानीच आहे।

फरमावले:
त्यानंतर “हुकूकुल-इबाद” (माणसांचे हक्क) हे देखील अत्यंत महत्त्वाचे आहेत. यामध्ये पती-पत्नी, भाऊ-बहिणी, जवळचे नातेवाईक या सर्वांचे हक्क येतात. शेजारी आणि परिसरातील लोकांचेही हक्क आहेत; त्या सर्वांची काळजी घेतली पाहिजे. इस्लामने तर शत्रूचेही हक्क ठरवले आहेत आणि गैर-मुस्लिमांचेही हक्क निश्चित केले आहेत.जर आपण हुकूकुल-इबाद पूर्णपणे पाळले, तर कधी कधी हेच हक्क उपासनेचे रूपही धारण करतात. त्यामुळे मग आपल्याला उपासनेपासून रोखले गेले तरी फरक पडत नाही. अल्लाह तआला फक्त यावर राजी होत नाही की तुम्ही बकऱ्याची कुर्बानी केली; तर तो हुकूकुल-इबाद पूर्ण केल्यावरच प्रसन्न होतो।

हदीसमध्ये आले आहे की तुमच्यापैकी कोणीही खऱ्या अर्थाने ईमानदार (मूमिन) होऊ शकत नाही जोपर्यंत तो आपल्या भावासाठीही तेच पसंत करत नाही जे तो स्वतःसाठी पसंत करतो.तसेच पैगंबर ﷺ यांनी असेही म्हटले आहे की तुम्ही तेव्हा पर्यंत स्वर्गात प्रवेश करू

शकत नाही जोपर्यंत तुम्ही ईमान धारण करत नाही, आणि तुम्ही तेव्हा पर्यंत ईमान धारण करू शकत नाही जोपर्यंत तुम्ही एकमेकांवर प्रेम करत नाही।म्हणून अहमदियांनी आपापसातील सर्व कटुता, राग आणि वैरभाव दूर करायला हवेत, जेणेकरून आपण केवळ परलोकातील जन्नतींचे वारसदार होऊ शकू असे नाही, तर या जगातही जन्नतसदृश समाज निर्माण करू शकू.आजच्या परिस्थितीत विशेषतः अहमदियांना आपापसातील सर्व राग-द्वेष दूर करून एक सुंदर आणि शांततापूर्ण समाजाची पायाभरणी करायला हवी, जेणेकरून विरोधक कोणत्याही प्रकारे आपल्या एकतेला तडा देऊ शकणार नाहीत.जर आपल्यामध्ये तक्वा (ईशभय) निर्माण झाला, तरच आपण अल्लाह् तआलाच्या जवळ जाणारे ठरू. आणि जर आपण कुर्बानी करू शकत नसलो तरीही, नीयत आणि तक्वाच्या आधारावर आपण कुर्बानी करणाऱ्यांमध्येच गणले जाऊ शकतो।हजरत मसीह मौऊद अलैहिस्सलाम यांनी असे म्हटले आहे की आपल्या नबी करीम ﷺ यांनी जी जमात (समुदाय) तयार केली होती, त्यातील प्रत्येक व्यक्ती शुद्ध आत्म्याचा (पवित्र स्वभावाचा) होता आणि प्रत्येकाने आपले जीवन धर्मासाठी अर्पण केले होते।त्यांच्यातील एकही व्यक्ती अशी नव्हती ज्याने दुटप्पी किंवा कपटी जीवन जगले होते.

हुजूर अनवर यांनी फरमावले की अल्लाह् अशी कृपा करो की आपली ईद केवळ दिखाव्याची ईद ठरू नये, तर ती अल्लाहचे हक्क आणि माणसांचे हक्क पूर्ण करण्याची ईद ठरावी. आपण त्याच्या कृपेचे लाभ घेणारे बनत राहावे।दुआही करा आणि आपल्या दुआंमध्ये शहीदांच्या त्या मुलांना देखील आठवा ज्यांनी मोठ्या कुर्बान्या दिल्या आहेत. अल्लाह् तआला त्यांना आणि त्यांच्या संततीला आपल्या संरक्षणात ठेवो.कैद्यांसाठीही दुआ करा. पाकिस्तानमध्ये जिथे विशेषतः कायद्यामध्ये अनेक बंधने घालण्यात आली आहेत, तिथे दुआ करा की अल्लाह् तआला या सर्व अडचणी आणि बंधने दूर करो आणि आपल्याला खऱ्या अर्थाने उघडपणे उपासना करण्याचा हक्क अदा करण्याची तौफीक प्रदान करो.सर्व अडथळे दूर व्हावेत आणि आपण मुक्तपणे जनावरांची कुर्बानीही करू शकू अशी परिस्थिती निर्माण होवो।अल्लाह् तआला आपल्याला अशी समज आणि विवेक देओ की आपण या कुर्बान्यांच्या खऱ्या आत्म्याला समजून घेणारे बनू।

खुत्ब्याच्या शेवटी हुजूर अनवर यांनी फरमावले की यासोबतच मी सर्व खुत्बा ऐकणाऱ्यांना, येथे बसलेल्या सर्वांना ईद मुबारकही म्हणतो. अल्लाह् तआला ही ईद बरकतपूर्ण करो। (आमीन)

اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ أَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔